सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१

# महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३

(दिनांक ३१ जुलै, २००५ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. XXI of 1963

# THE MAHARASHTRA TAX ON SALE OF ELECTRICITY ACT, 1963

*(As amended upto the 31st July 2005)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत : रु. ४.००]

# महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३

अनुक्रमणिका

उद्देशिका.


| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २ | व्याख्या | १ |
| ३ | कराचा भार | २ |
| ४ | कर भरणे | २ |
| ५ | राज्य वीज निधी इत्यादींकडे कराचे उत्पन्न हस्तांतरित करणे. | २ |
| ५-क | ज्यासाठी निधी खर्च करता येईल ती प्रयोजने | २ |
| ६ | लायसनदाराने हिशेबाची पुस्तके ठेवणे व विवरणे सादर करणे | ३ |
| ७ | सूट देण्याचा अधिकार | ३ |
| ८ | तपासणी करणारे अधिकारी | ३ |
| ९ | कराची वसुली | ३ |
| १० | कराचा परतावा | ३ |
| ११ | शास्ती | ३ |
| १२ | कंपन्यांनी केलेले अपराध | ४ |
| १३ | नियम करण्याचा अधिकार | ४ |


(शा.म.मु.) एच १५७९–१ (६०६७–११-२००६)

## सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१[1].

# [ महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३ ]

[२४ एप्रिल, १९६३]

या अधिनियमात खालील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२. (७ सप्टेंबर १९७४)*
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७५. (१ जानेवारी १९७६)*
सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.
सन १९९३ #चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८. (१५ एप्रिल १९९३)*
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. @
सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. @@(१ मे १९९८)*
सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०. ** (१ ऑक्टोबर २०००)*
सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. $ (५ एप्रिल २००४)*

**महाराष्ट्र राज्यातील विजेच्या विक्रीवर कर बसविणे आणि राज्यातील वीज पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी व त्याचा विकास करण्यासाठी त्यातून निधी उभारण्याची तरतूद करणे यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यातील विजेच्या विक्रीवर कर बसविणे आणि राज्यातील वीज पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी व त्याचा विकास करण्यासाठी, त्यातून निधी उभारण्याची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौदाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:—

संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो दिनांक १ जानेवारी, १९६३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

[2][**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

१९४८ चा ५४. (क) " मंडळ " याचा अर्थ, विद्युत (पुरवठा) अधिनियम, १९४८ याच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित करण्यात आलेले आणि विद्युत अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळेस, असे मंडळ म्हणून कार्य करीत असलेले राज्य वीज मंडळ, असा आहे ;

२००३ चा ३६. (ख) " विद्युत अधिनियम " याचा अर्थ, विद्युत अधिनियम, २००३, असा आहे ;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९६३, भाग पाच, पृष्ठ ११ (इंग्रजी) पहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

# शासकीय अधिसूचना वित्त विभाग क्रमांक एमएससी-१०९२/सीआर-११३७/एनआरजी-२, दिनांक ४ एप्रिल, १९९४ अन्वये हा अधिनियम १ जानेवारी, १९९४ रोजी अंमलात आला.

@ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४८ द्वारे १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

@@ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३० द्वारे १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ निरसित करण्यात आला.

** सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ८ द्वारे २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ निरसित करण्यात आला.

$ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १० द्वारे २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ निरसित करण्यात आला.

[2] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(ग) '' वीज उपक्रम '' यात मंडळ, वीज निर्मिती कंपनी, लायसनदार आणि मुख्यतः स्वतःच्या वापरासाठी आणि तिच्या सहयोगींच्या वापरासाठी वीज निर्मिती करणारी व्यक्ती, यांचा समावेश होतो ;

(घ) '' विहित '' याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(ङ) '' कर '' याचा अर्थ, या अधिनियमान्वये बसविलेला कर, असा आहे ;

(च) यात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, विद्युत अधिनियमान्वये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.]

करांचा भार

[1][ ३. या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दराने आणि अशा दिनांकापासून एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, [2][ वीज उपक्रमाने, ग्राहकाला केलेल्या विजेच्या संपूर्ण विक्रीच्या संबंधात ] प्रति युनिट पन्नास पैशापेक्षा जास्त नसेल अशा दराने कर आकारण्यात येईल व तो भरण्यात येईल :]

[3][ परंतु एका वीज उपक्रमाने दुसऱ्या वीज उपक्रमाला विक्री केलेल्या विजेवर कोणताही कर बसविण्यात आणि वसूल करण्यात किंवा देण्यात येणार नाही.]

कर भरणे.

**४.** या अधिनियमान्वये भरावयाच्या कराची रक्कम विहित केलेल्या प्रत्येक [4][वीज उपक्रम] विहित केलेल्या एका वेळी किंवा अनेक वेळी व विहित केलेल्या रीतीने राज्य शासनाकडे भरील.

राज्य वीज निधी इत्यादींकडे कराचे उत्पन्न हस्तांतरित करणे.

[5][ ५. (१) या अधिनियमान्वये वसूल केलेल्या कराचे उत्पन्न (कलम ९ अन्वये भरावयाच्या कोणत्याही व्याजासह) प्रथम राज्याच्या एकत्रीकृत निधीत जमा करण्यात येईल व याबाबतीत कायद्याद्वारे योग्य रीतीने विनियोजन केल्यानंतर,—

(क) वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांना केलेल्या वीज विक्रीच्या संबंधात, वीज उपक्रमाने राज्य शासनाला दिलेली प्रति नेट चार पैसे कराची रक्कम, ऊर्जेची पुनर्निर्मिती करता येण्याजोग्या व अपारंपारिक ऊर्जास्त्रोतांच्या निर्मितीच्या परियोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाकडे किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याकडे हस्तांतरीत करण्यात येईल ; आणि १८६० चा २१.

(ख) उर्वरित रक्कम, राज्य वीज निधी या नावाने संबोधण्यात येणाऱ्या स्वतंत्र निधीत जमा करण्यात येईल आणि त्यात हस्तांतरित करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाकडे आणि राज्य वीज निधीकडे हस्तांतरीत केलेली कोणतीही रक्कम राज्याच्या एकत्रीकृत निधीवर भारित असेल.]

ज्यासाठी निधी खर्च करता येईल ती प्रयोजने.

[6][ '' **५क.** राज्यातील वीज पुरवठ्यामध्ये वाढ व सुधारणा करणे, आणि राज्यात ग्रामीण विद्युतीकरण परियोजना चालविण्यासाठी या निधीतून खर्च करता येईल आणि या प्रयोजनाच्या पुरःसरणार्थ, राज्य शासन, वीज उपक्रमास आणि मंडळास निधीमधून अर्थसहाय्य किंवा कर्जे किंवा अर्थोपाय आगाऊ रकमा देईल.]

---

१. सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३, अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.
२. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३(अ), अन्वये '' निर्मिती करणाऱ्या लायसनदाराने विक्री केलेल्या ऊर्जेच्या प्रत्येक युनिटवर '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये '' ठोक लायसनदार '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ५ दाखल करण्यात आले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ५क दाखल करण्यात आले.

६. ज्यांना कर भरणे आवश्यक आहे असा प्रत्येक [1][वीज उपक्रम] विहित नमुन्यात हिशोबांची पुस्तके ठेवील व त्यासंबंधीची विवरणे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी राज्य शासनाकडे किंवा त्या शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करील व त्यात त्याने विकलेल्या ऊर्जेची युनिटे व त्यावर देय असलेल्या कराची रक्कम दर्शविण्यात येईल. लायसनदाराने हिशेबाची पुस्तके ठेवणे व विवरणे सादर करणे.

[illegible] तर, ते लादील अशा शर्तींना (तशा शर्ती असल्यास) अधीन राहून, त्या शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वितरण [2][वीज उपक्रमाच्या कोणत्याही वर्गाला किंवा ग्राहकांना]केलेल्या ऊर्जेच्या विक्रीवर या अधिनियमान्वये देय असलेल्या संपूर्ण कराच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या प्रदानाबाबत सूट देता येईल. [illegible] अधिकार.

८. (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, विहित करण्यात आल्या असतील अशा अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची निरीक्षक म्हणून नेमणूक करता येईल. तपासणी करणारे अधिकारी.

(२) प्रत्येक निरीक्षक, विहित करण्यात येतील अशी कर्तव्ये पार पाडील आणि अशा अधिकारांचा वापर करील.

१८६० चा महा. ४५. (३) प्रत्येक निरीक्षक हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

९. [3][कराची येणे असलेली रक्कम विहित केलेल्या वेळी व विहित केलेल्या रीतीने न भरल्यास ती थकबाकी म्हणून समजण्यात येईल आणि त्यानंतर, अशी रक्कम देय झाल्याच्या लगतनंतरच्या पहिल्या तीन महिन्यांसाठी दरसाल १८ टक्के दराने आणि त्यानंतर अशी रक्कम भरण्यात येईपर्यंत दरसाल २४ टक्के दराने व्याज देय होईल;] आणि अशी रक्कम, तिच्यावरील व्याजासह, राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या विकल्पाधिकारानुसार, एकतर दिवाणी न्यायालयामार्फत किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य असेल. कराची वसुली.

१०. राज्य शासनास नियमांद्वारे असे विहित करता येईल की, नियमांत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि अशा शर्तींना (कोणत्याही मुदत मर्यादेच्या कालावधीसह) अधीन राहून, संपूर्ण कराची किंवा त्याच्या भागाची रक्कम [4][वीज उपक्रमाला] परत करता येईल. कराचा परतावा.

११. जर एखादी व्यक्ती,—

(क) कलम ६ च्या तरतुदींनुसार आणि त्याबाबतीत केलेल्या नियमांनुसार, हिशेबाची पुस्तके ठेवण्यात किंवा विवरणे सादर करण्यात कसूर करील, किंवा शास्ती.

(ख) एखाद्या निरिक्षकास, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये देण्यात आलेले अधिकार वापरण्यास किंवा लादलेली कर्तव्ये पार पाडण्यास जाणूनबुजून अडथळा आणील, किंवा

(ग) कोणत्याही नियमाचे उल्लंघन करील तर, अपराध सिद्ध झाल्यानंतर तिला, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये " ठोक लायसनदार " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ८, अन्वये " लायसनदारांच्या कोणत्याही वर्गाला किंवा ग्राहकांना " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७५, कलम २, अन्वये " कराबद्दल येणे असलेली " या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि " द्यावे लागेल " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ९, अन्वये " ठोक लायसनदाराला " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**१२.** (१) या अधिनियमाखाली एखादा अपराध कंपनीने केला असेल अशा बाबतीत, अपराध केला असेल तेव्हा कंपनीची प्रभारी असलेली आणि कंपनीचे कामकाज चालविण्यास जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी ही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि त्यांच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षा होण्यास ते पात्र असतील :

परंतु असे की, एखाद्या व्यक्तीने असा अपराध आपल्या नकळत करण्यात आला होता किंवा असा अपराध करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आपण योग्य ती दक्षता घेतली होती हे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या अशा कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमात तरतूद केलेली शिक्षा होण्यास पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीने केला असेल आणि तो अपराध कंपनीच्या एखाद्या संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूक संमतीने केला गेला आहे अथवा त्यांनी हयगय केल्यामुळे तो घडला आहे असे म्हणता येण्यासारखे आहे असे सिद्ध झाल्यास, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांनाही त्या अपराधाबद्दल दोषी समजण्यात येईल आणि ते त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि शिक्षा दिली जाण्यास पात्र ठरतील.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय, असा आहे आणि त्यात भागीदारी संस्था किंवा इतर व्यक्तींच्या संघाचा समावेश होतो.

(ख) " संचालक " या संज्ञेचा भागीदारी संस्थेच्या संबंधातील अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

नियम करण्याचा अधिकार.

**१३.** (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमात,—

(क) कलम ४ खालील कर भरण्याची वेळ किंवा वेळा आणि रीत विहित करता येईल ;

[1] * * * *

(ग) कलम ६ अन्वये ठेवावयाच्या हिशेबाच्या पुस्तकांचे नमुने आणि त्या कलमान्वये आवश्यक असलेली विवरणे कोणत्या वेळी आणि कोणत्या नमुन्यात सादर केली पाहिजेत ते विहित करता येईल;

(घ) कलम ८ खालील निरीक्षकांच्या अर्हता, त्यांचे अधिकार आणि त्यांची कर्तव्ये विहित करता येतील;

(ङ) कलम १० अन्वये ज्या परिस्थितीत आणि ज्या शर्तींना अधीन राहून, परतावा देता येईल ती परिस्थिती आणि त्या शर्ती विहित करता येतील;

(च) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी तरतूद करता येईल.

(३) नियम करण्याचा या कलमान्वये देण्यात आलेला अधिकार हा, त्याची प्रथमच अंमलबजावणी करण्यात येईल त्याव्यतिरिक्त इतर प्रसंगी, पूर्वप्रसिद्धी करून नियम करण्याच्या शर्तींला अधीन असेल.

(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, राज्य विधान मंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशारितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमांत कोणताही

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये खंड (ख) वगळण्यात आला.

फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील, किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरुपातच अमलात येईल, किंवा यथास्थिती तो अमलात येणार नाही; तथापि, उक्त नियमांत अशा रीतीने कोणताही फेरबदल केल्यामुळे तो नियम अशा रीतीने रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई